19 DEC 2021

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सैनिक हा विषय संरक्षण पत्रकारितेमध्ये महत्त्वाचा

## डॉ. विसपुते : शिवाजी विद्यापीठात संरक्षण पत्रकारितेवर कार्यशाळा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

संरक्षणविषयक बातमीदारी करत असताना जनसंपर्क अधिकाऱ्यांकडून मिळणाऱ्या अधिकृत माहितीला महत्त्व असले तरी संरक्षणातील निवृत्त अधिकाऱ्यांकडून संरक्षण हा विषय समजून घेण्यासाठी खूपच मदत होते. संरक्षण पत्रकारितेमध्ये 'सैनिक' हा विषय महत्त्वाचा स्रोत असल्याचे मत डॉ. नरेंद्रकुमार विसपुते यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागातर्फे 'संरक्षण पत्रकारिता' या विषयावर शनिवारी एकदिवसीय ऑनलाईन कार्यशाळेचे आयोजन केले होते. त्यात मुंबई दूरदर्शन केंद्राचे वृत्त विभागाचे प्रमुख आणि संरक्षण दलाच्या मुंबई येथील केंद्राचे माजी जनसंपर्क अधिकारी डॉ. नरेंद्रकुमार विसपुते यांनी बीजभाषण केले. तसेच विभागाच्या 'शिवाजी विद्यापीठ स्टुडंटस् फोरम'चे औपचारिक उद्घाटन केले.

डॉ. विसपुते यांच्यासह संरक्षण तसेच आंतरराष्ट्रीय घडामोडींवरील लेखक मधुबन पिंगळे आणि विभागाचे सहयोगी व्याख्याते व संरक्षणविषयक घडामोडींचे वार्तांकन करणारे मुक्त पत्रकार सचिन दिवाण यांनीही मार्गदर्शन केले. डॉ. विसपुते म्हणाले,


डॉ. नरेंद्रकुमार विसपुते


मधुबन पिंगळे


सचिन दिवाण

संरक्षण दलांविषयी वार्तांकनात संरक्षणासह अर्थकारण, राजकारण, आंतरराष्ट्रीय घडामोडी, क्रीडा, फॅशन, संशोधन, दळणवळण अशा अनेक उपविषयांचा समावेश होतो.

या व्यापक क्षेत्रात कामाच्या उत्तम संधी उपलब्ध आहेत; मात्र त्यात धोकेही तितकेच आहेत. या क्षेत्रात काम करत असताना स्थल-कालाचे बंधन नाही. आव्हाने पेलण्याची आणि त्यासाठी अभ्यास आणि त्याग करण्याची तसेच शिस्तबद्ध वातावरणात काम करण्याची तयारी असेल तर या क्षेत्रात उत्तम करिअर करता येऊ शकते. मधुबन पिंगळे म्हणाले, संरक्षण पत्रकारिता ही भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्यकाळ या तिघांनाही कवेत घेणारी असते. शांतता आणि युद्ध अशा दोन्ही काळांत तिचे काम सुरू असते. त्यात भूतकाळातील विजयांपासून प्रेरणा घेतानाच पराभवांचे मूल्यमापन करून धडे घ्यायचे असतात. वर्तमानकाळातील धोक्यांचा आणि सज्जतेचा आढावा घेण्याबरोबरच भविष्यातील आव्हानावरही नजर ठेवावी लागते. विविधांगी ज्ञान जोपासण्याबरोबरच अचूकतेचा ध्यास घेणे आणि संयम बाळगणे या बाबी या क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी उपयुक्त ठरतात, असे पिंगळे यांनी सांगितले.

सचिन दिवाण यांनी देशाच्या सेनादलांची रचना आणि त्यांची कार्यपद्धती यांची माहिती दिली. तसेच सूत्रसंचालन केले. विभागाच्या प्रमुख डॉ. निशा मुडे-पवार यांनी प्रस्तावना केली आणि 'शिवाजी विद्यापीठ स्टुडंटस् फोरम'च्या स्थापनेमागील भूमिका स्पष्ट केली. विभागातील सहायक प्राध्यापिका डॉ. सुमेधा साळुंखे, सहयोगी प्राध्यापक चंद्रशेखर वानखेडे, अनुराधा इनामदार, जयप्रकाश पाटील यांच्यासह प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
19 DEC 2021 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ऑक्टोबरच्या सहाशेवर परीक्षा ऑनलाईन

## शिवाजी विद्यापीठ विद्या परिषदेच्या बैठकीत निर्णय

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शासन नियमानुसार शिवाजी विद्यापीठ ऑफलाईन पद्धतीने सुरू झाली आहेत. परंतू बहुतांश विद्यार्थ्यांचे कोरोना लसीचे दोन डोस झालेले नाहीत. त्यामुळे शासन नियमांच्या आधीन राहून मार्च–एप्रिल २०२१ प्रमाणे ऑक्टोबर २०२१ च्या जवळपास ६०० पेक्षा जास्त परीक्षा ऑनलाईन पद्धतीने होणार आहेत. तसेच दूरशिक्षण प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या सोयीनुसार महाविद्यालयात प्रवेश देण्याचा निर्णय विद्या परिषदेच्या बैठकीत घेण्यात आला. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.



कोरोना कालावधी असल्याने मार्च–एप्रिल २०२१ च्या परीक्षांमध्ये काही टॉपिक कमी करून परीक्षा घेण्यात आली होती. परंतू ऑक्टोबर २०२१ च्या परीक्षेत शंभर टक्के अभ्यासक्रमावर ५० गुणांची वस्तुनिष्ठ पद्धतीने ऑनलाईन परीक्षा घेण्यात येणार आहे.

पान ६ पहा

# ऑक्टोबरच्या सहाशेवर परीक्षा ऑनलाईन

पान १ वर

२५ प्रश्न आणि १ तासाचा वेळ असणार आहे. प्रथम वर्षाची परीक्षा महाविद्यालयाने घ्यावयाची आहे. तर अभियांत्रिकी, फार्मसी, विधी, आर्किटेक्ट, एम. बी. ए., शिक्षणशास्त्र विषयाच्या परीक्षा क्लस्टर पध्दतीने होतील. त्याचबरोबर सर्टीफिकेट कोर्स, डिप्लोमा, पी. जी. डिप्लोमाच्या परीक्षा महाविद्यालय व अधिविभागाने घ्यावयाच्या आहेत. दूरशिक्षणला युजीसीने दिलेल्या सुचनांची पुर्तता करण्याची प्रक्रिया सुरू आहे. तोपर्यंत विद्यार्थ्यांच्या सोयीनुसार नजीकच्या महाविद्यालयात प्रवेश दिला जाणार आहे. युजीसीला प्रस्ताव पाठवला जाईल, या प्रस्तावाला मंजुरी मिळाल्यानंतर पुन्हा दूरशिक्षणमधून विद्यार्थी शिक्षण घेवू शकतात, असा निर्णय विद्या परिषदेच्या बैठकीत घेण्यात आला. या निर्णयाची व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेने अंमलबजावणी केली जाईल. यावेळी जवळपास ७० विद्या परिषदेचे सदस्य उपस्थित होते.